# जानेवारी महिन्याचा परिचय

१ जानेवारी, २०२१

आत्मीय वाचक,

शुभ, शुभ, *शुभ नूतन वर्ष २०२१*— आता या क्षणी हे पत्र वाचणाऱ्या प्रत्येक सिद्धयोग्यास तसेच जे सिद्धयोग मार्गावर नवीन आहेत त्या साधकांना, नूतन वर्षाभिनंदन! जानेवारी महिन्यात तुमचे स्वागत आहे.

नववर्षाचा प्रत्येक दिवस हा आश्वासनांनी ओतप्रोत भरून आणि आपल्या जीवनासाठी नवीन संभावनांच्या उपहारासह आपल्या दिशेने चालत येत असतो. सिद्धयोग मार्गावर, आपण अशा या शक्तिशाली शुभारंभांचा सन्मान करत असतो आणि आपले संपूर्ण अवधान त्यांवर केंद्रित करत असतो.

सर्व मानवजातीसाठी हे नूतन वर्ष इतर कोणत्याही वर्षापेक्षा भिन्न आहे. अनेक लोक वर्ष २०२०ला निरोप देण्यासाठी आणि वर्ष २०२१मध्ये प्रवेश करण्यासाठी उत्सुक आहेत. ते दिवस मोजत होते की, समयाचे हे आव्हानात्मक पृष्ठ आता कधी उलटणार—आणि अखेरीस, ते उलटले आहे. तरीदेखील वैश्विक महामारी अजूनही जागतिक स्तरावर समस्त मानवजातीला प्रभावित करते आहे आणि इतर दुःखे व समस्यादेखील वाढतच आहेत.

सिद्धयोगी असण्याच्या नात्याने आपण आपल्या उद्देशाप्रति अधिक जागरूकतेसह आणि आपण परम सत्यामध्ये दृढतेने स्थिर राहू या संकल्पासह आपल्या साधनेप्रति पुन्हा वचनबद्ध होऊ शकतो, मग आपल्या आसपासच्या जगात कितीही का उलथापालथ होईना.

समयाच्या एका नव्या खंडाचा आरंभ जेव्हा होतो, तेव्हा तो आपल्याला आमंत्रित करतो की आपण भूतकाळाला सोडून पुढे जावे, खुलेपणाने वर्तमानात प्रवेश करावा आणि आशांसह व अपेक्षांसह भविष्यकाळाचे स्वागत करावे. आजच्या या दिवशी, आपण जेव्हा पूर्णतः जागरूक आहोत, तेव्हा आपल्या डोळ्यांमध्ये तीव्र उत्कंठा आणि आशादायक उत्साह भरलेले आहेत.

आज सकाळी, वर्षाच्या या पहिल्या सूर्योदयाचे मनोमन स्वागत करून मी फ्लोरिडामधील सर्व बाजूंनी बंदिस्त असलेल्या माझ्या पोर्चमध्ये गेले. पक्ष्यांचे कूजन आणि आजूबाजूच्या खूप मोठ्या संख्येने असलेल्या पाम वृक्षांचे स्वागतपर अभिवादन तसेच शेरवुड या प्रशांत सरोवरातील तरंग या सर्वांच्या साथीने मी सर्वांच्या क्षेमकुशलतेसाठी प्रार्थना केली—सर्व लोक, धरती, पशुपक्षी आणि पृथ्वी यांच्यासाठी प्रार्थना केली. पहाटेच्या ताज्यातवान्या हवेत, गुरुमाई चिद्विलासानंद यांना माझ्या

हृदयात धारण करून, स्वतःच्या डोळ्यांसमोर असलेल्या दृश्यातील सूक्ष्मतांची नोंद मी काही वेळ केली आणि या नववर्षाप्रति मनात उद्भवणाऱ्या भावनांविषयी मी विचार करू लागले.

तिथे उभी राहून मी तुम्हा सर्वांविषयी विचार करू लागले, की जगभरात तुम्ही कुठेही जरी असलात, तरीही हे पत्र वाचत असाल. ज्या कोणत्या ऋतूमानात तुम्ही राहता अथवा ज्या कोणत्या परिसरात तुम्ही राहता; तुम्ही कुठेही जरी असलात, तरी आपल्या सर्वांसाठी एक गोष्ट खरी आहे : आता समयाचा हा उंबरठा ओलांडून जेव्हा आपण नूतन वर्षात पाऊल टाकत आहोत, तेव्हा श्रीगुरुमाईंचे प्रेम व त्यांची कृपा आपल्यासोबत आहे.

मी तुम्हाला एक ठोस मार्ग सांगू इच्छिते, ज्याच्याद्वारे मी हा आशीर्वाद अनुभवते. एक संपादिका आणि लेखिका या स्वरूपात स्वतःचे काम करत असताना, प्रत्येक नवीन प्रकल्पाचा आरंभ करण्यापूर्वी मी श्रीगुरुमाईंच्या कृपेचे आवाहन करते. उदाहरणार्थ, हे पत्र लिहित असताना मी कल्पना करते आहे की, मी तुम्हा सर्वांसोबत आहे. मी असे मानसचित्रण करते आहे की, आपण सर्वजण या महिन्यात प्रवेश करत आहोत; मला ही जाणीव होते आहे की जे कोणी हे पत्र वाचेल ती प्रत्येक व्यक्ती गुरुमाईंच्या कृपेचा अनुभव स्वतःच्या अनोख्या पद्धतीने घेईल.

माझी कामना अशी आहे की, सिद्धयोग मार्गावरील साधक म्हणून जेव्हा आपण या उंबरठ्यावरून पलीकडे पाऊल टाकून पुढची वाटचाल करू, तेव्हा २०२१ या नववर्षात उज्ज्वल नवीन शुभारंभांचा आणि त्याचबरोबर नवीन अर्थबोधांचा समावेश असावा.

**महोत्सव आणि पर्वे**

आणि आता आपण, वर्ष २०२१च्या जानेवारी महिन्यात येत असलेल्या काही महत्त्वाच्या दिवसांविषयी जाणून घेऊ या. यांतील प्रत्येक पर्व ही आपल्यासाठी एक सुसंधी आहे की जेव्हा आपण वर्तमान क्षणात पुन्हा प्रवेश करू शकतो, दिव्य सद्‌गुणांना ओळखू शकतो व त्यांचा अभ्यास करू शकतो. जानेवारी महिन्यातील ही तीनही पर्वे आपल्याला त्या अनोख्या संधी प्रदान करतात, जेव्हा आपण नवीन आरंभांच्या या नूतन दिवसांमध्ये आपल्या आध्यात्मिक अभ्यासांवर व सिद्धयोग मार्गाच्या उगमावर आणि शिकवणींवर केंद्रण करू शकतो.

- आश्रमातील दिनचर्येचा एक भाग म्हणून श्री गुरुगीतेच्या पठणाचा समावेश ७ जानेवारीला करण्यात आला होता, या वर्षी याचा एकोणपन्नासाव्वा वर्धापन दिवस आहे. ‘सिद्धयोग पथ पर श्रीगुरुगीता का महत्त्व,’ या लेखामध्ये स्वामी शांतानंद या पावन स्तोत्राच्या पठणाचा इतिहास आणि त्याच्या शक्तीविषयी विस्तारपूर्वक सांगतात.

- १४ जानेवारी रोजी आपण मकरसंक्रांतीचा उत्सव साजरा करणार आहोत. भारतीय परंपरेनुसार या दिवशी उत्तरायणाचा आरंभ होतो [सूर्याची सहा महिन्यांसाठी उत्तर दिशेकडे यात्रा] आणि ज्यामुळे उत्तर गोलार्धात सूर्यप्रकाश निरंतर वाढत जातो. या उत्सवाच्या प्रसंगी आपण सूर्यदेवतेची आराधना करतो, जो प्रत्येक दिवशी तेजस्वीपणे तळपत राहतो आणि त्याबरोबरच स्वतःच्या कुंचल्याने आकाशात मनभावन रंगाची उधळण करत असतो.
- २६ जानेवारीला भारतात प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो—तो दिवस, ज्या दिवशी भारताने नवीन राज्यघटनेचा स्वीकार केला आणि एका लोकशाही राज्यपद्धतीची स्थापना केली. आपण भारताच्या महानतेचा उत्सव साजरा करतो, ज्याच्या परोपकारिकतेने, समृद्ध परंपरेने आणि ज्ञानाच्या भांडाराने जगाला तसेच विशेषकरून सिद्धयोग मार्गावरील आपल्या सर्वांनाही खूप काही दिले आहे. प्रजासत्ताक दिन हा त्या उदात्त मूल्यांचा आणि त्या भावनेचा सन्मान करण्याचा दिवस आहे जी देशाच्या ध्वजाद्वारे दर्शवली गेली आहे.

पुन्हा एकदा, माझ्या वतीने या शुभेच्छा की, नववर्ष २०२१ तुमच्या सर्वांसाठी सुखदायक, सुरक्षित आणि संतोषदायक असो!

आदर सहित,
सिंधू पोर्टर

© २०२१ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.